**कृपया प्रसिद्धीसाठी** **9 मे 2014**

**भाजपा नेते व माजी पेट्रोलियम मंत्री श्री.राम नाईक यांनी**
**शुक्रवार, 9 मे 2014 रोजी मुंबई येथे पत्रकार परिषदेत वितरीत केलेले निवेदन**

***मुंबईच्या मतदार याद्या पुन्हा नव्याने बनवा : राम नाईक***

**मुंबई, शुक्रवार** : ''संसदीय लोकशाही यशस्वी करण्यासाठी मतदार याद्या निर्दोष करुन त्यांचे पावित्र्य राखण्यात निवडणूक आयोग मुंबईमध्ये पूर्णतः अयशस्वी झाले आहे. मतदार याद्यातील गोंधळ संपवून आगामी विधानसभा निवडणूक यशस्वी करण्यासाठी मतदारांना त्यांचा हक्क देऊन मतदानाचे कर्तव्य पूर्ण करण्यासाठी निवडणूक आयोगाने एक विशेष बाब म्हणून मुंबई, ठाणे आणि पुणे या महानगरांच्या मतदार याद्या घरोघरी जाऊन नव्याने तयार केल्या पाहिजेत,'' अशी मागणी भाजपा नेते आणि माजी पेट्रोलियम मंत्री श्री. राम नाईक यांनी केली आहे. ते आज मुंबईत पत्रकार परिषदेत बोलत होते.

मतदार याद्या नव्याने बनविण्याच्या मागणीसंबंधी अधिक माहिती देताना श्री. राम नाईक म्हणाले, ''नुकत्याच 24 एप्रिल रोजी पार पडलेल्या मुंबईच्या निवडणुकीतील मतदार याद्यांची माहिती संकलित केली असताना असे लक्षात आले की 2009 मध्ये मुंबईतील सहा लोकसभा मतदार संघात एकूण 97,79,650 मतदार होते, तर 2014 च्या यादीत मतदारांची संख्या 98,97,699 आहे. म्हणजेच वाढलेल्या मतदारांची संख्या फक्त 1,18,049 आहे. याच बरोबर मुंबई शहर जिल्हा निवडणूक अधिकारी आणि मुंबई उपनगर जिल्हा निवडणूक अधिकारी यांच्याकडून 2009 ते 2014 पर्यंत वाढलेल्या मतदारांची संख्या 18,93,686 आहे, तर कमी केलेल्या मतदारांची संख्या 16,23,612 आहे. म्हणजेच वाढलेल्या आणि कमी केलेल्या मतदारांच्या संख्येतील फरक 2,70,074 आहे. यातील धक्कादायक आकडा आहे कमी केलेल्या मतदारांचा, म्हणजेच 16,23,612. इतक्या मोठ्या संख्येने मतदार कमी करताना निवडणूक यंत्रणेने काळजी घ्यावयास पाहिजे होती परंतु त्यांना 'नोटिस' देणे, मतदार न भेटल्यास पंचनामा करणे आणि नंतर त्यांची नावे कमी करणे, ज्यांचे फोटो नाहीत त्यांचे फोटो प्राप्त करणे, वगैरे कामे योग्य पद्धतीने झालेली नाहीत. त्यामुळे या मतदार याद्यांचे पावित्र्यच नष्ट झालेले आहे. यावर एकच उपाय आहे आणि तो म्हणजे मतदार याद्या घरोघरी जाऊन नव्याने बनविणे. मुंबई प्रमाणेच ठाणे आणि पुणे या ठिकाणच्या मतदार याद्यातही गोंधळ झालेला असल्यामुळे त्यांच्याही याद्या नव्याने केल्या पाहिजेत.''

मतदार याद्या निर्दोष असल्या पाहिजेत याबद्दल केलेल्या प्रयत्नांची अधिक माहिती सांगताना श्री. राम नाईक पुढे म्हणाले,''2004 च्या मतदार याद्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर दुबार मतदार आहेत हे लक्षात आल्यानंतर 4 एप्रिल 2008 रोजी मुख्य निवडणूक आयुक्त श्री. एन.गोपालस्वामी यांची प्रत्यक्ष भेट घेऊन दुबार मतदारांबद्दल चौकशी करण्याची विनंती केली. तसेच मतदार संघांच्या पुनर्रचनेपूर्वी उत्तर मुंबई लोकसभा मतदार संघात समाविष्ट असलेल्या मालाड, कांदिवली आणि बोरीवली या 3 विधानसभा मतदार संघातील मतदारांची मुंबईतील 34 आणि ठाण्यातील 6 विधानसभेच्या मतदारांची तुलना करुन या 3 विधानसभा मतदारसंघात 18,02,877 मतदारांपैकी 3, 57, 520 म्हणजेच 20% दुबार नावे असल्याची माहिती नाव आणि अनुक्रमांकासहित 30 एप्रिल 2008 रोजी महाराष्ट्राचे मुख्य निवडणूक अधिकारी श्री. देवाशिष चक्रवर्ती यांना सादर केली. त्यानंतर 2008 आणि 2009 मध्ये निवडणूक आयोग आणि महाराष्ट्राचे मुख्य निवडणूक अधिकारी यांच्याशी वेळोवेळी चर्चा होऊन 27 फेब्रुवारी 2012 रोजी नव्याने मतदार यादी बनविण्यासंबंधी मुख्य निवडणूक आयुक्त श्री. एस.वाय. कुरेशी यांना विनंती केली तसेच निवडणूक आयोगाच्या तिन्ही सदस्यांसमोर वस्तुस्थितीची मांडणी (प्रेझेंटेशन) केली. त्यानंतर मतदार याद्या सुधारण्याचे काम केले जाईल असे स्पष्ट आश्वासन निवडणूक आयोगाने दिले. 2014 च्या निवडणुकीसाठी

याद्या अद्ययावत करण्याचे काम सुरु झाल्यानंतर 10 जुलै 2013 रोजी राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी श्री. नितिन गद्रे यांची भेट घेतली. तसेच 15 जुलै 2013 रोजी त्यावेळी मुंबई शहर जिल्हा निवडणूक अधिकारी श्री. चं. व. ओक यांच्याशी सविस्तर चर्चा करुन मतदार याद्या निर्दोष बनविण्याबद्दल चर्चा केली. त्यावेळी त्यांच्याकडे मुंबई उपनगर जिल्ह्याचा अतिरिक्त कार्यभारही होता. चर्चेमध्ये एकूण पाच सूचना केल्या. त्या पुढील प्रमाणे होत्याः

1) मतदारांची नावे घरोघर जाऊन तपासावीत म्हणजे संबंधित घरे आहेत की नाहीत याची खात्री होईल. घरे सापडत नसल्याबद्दल तपासणी निरीक्षकांनी त्याप्रमाणे प्रमाण-पत्र दिले पाहिजे. त्या आधारावर नावे कमी करण्याची वैधानिक प्रक्रिया करता येऊ शकेल.

2) खोटे मतदान टाळण्यासाठी कोणत्याही परिस्थितीत मतदार याद्यामध्ये 100 टक्के छायाचित्रे असली पाहिजेत याकडे कटाक्षाने लक्ष पुरवावे.ज्यांची छायाचित्रे मतदार यादीत नाहीत त्यांना 'नोटीस' देऊन छायाचित्रे काढून घेण्यास सांगावे. ठराविक मुदत द्यावी, त्या मुदतीत छायाचित्रे न काढल्यास वैधानिक प्रक्रीया पूर्ण करुन त्यांची नावे मतदार यादीतून काढून टाकावी.

3) ज्यांची नावे दुबार आहेत त्यांना 'नोटीस' देऊन कोणते नाव ठेवावे आणि कोणते गाळावे हे त्यांच्याकडून लिहून घ्यावे. तसेच त्यांची छायाचित्रे काढण्याची व्यवस्था करावी.

4) घरोघर जाऊन तपासणी करताना ज्या इमारतींचा पुनर्विकास चालू असल्याने मतदार तिथे रहात नसतील परंतु त्यांची छायाचित्रे मतदार यादीत असतील अशांच्यासाठी योग्य नियम करुन त्यांचे मतदानाचे हक्क अबाधित राहतील याची काळजी घ्यावी.

5) घरोघर जाऊन तपासणी होईल त्यावेळी मृत मतदारांची नावे रद्द करण्यासंबंधी त्या कुटुंबातील अन्य मतदारांची स्वाक्षरी घ्यावी म्हणजे नंतर वाद निर्माण होऊ शकणार नाही.

या सूचनांप्रमाणे मुंबईतील मतदार याद्या अद्ययावत केल्या असत्या तर जो घोळ मुंबईतील निवडणूक यंत्रणेने केला तो झाला नसता.''

''यावेळच्या निवडणुकीत घरोघरी जाऊन मतदारांना मतदार चिठ्ठ्यांचे वितरण करण्याचा योग्य निर्णय निवडणूक आयोगाने घेतला. त्या मतदार चिठ्ठ्या घरोघर पोचवणा-या कर्मचा-यांनी जी घरे आणि मतदार सापडले नाहीत त्या मतदार चिठ्ठ्यांचा हिशेब करुन लोकसभा मतदार संघाच्या निवडणूक अधिका-यांना परत केल्या असतील तर ती संख्याही जाहिर करावी म्हणजे निवडणूक यंत्रणेत किती घोळ आणि अकार्यक्षमता आहे हे लक्षात येईल'' असेही श्री. राम नाईक म्हणाले.

नव्या याद्या तयार करण्यासंबंधी श्री. राम नाईक यांनी मुख्य निवडणूक आयुक्त श्री. व्ही.एस.संपत यांना पत्र पाठविले असून प्रत्यक्ष भेटीची वेळही मागितली आहे. ''निवडणूक आयोगाकडे जिल्हा स्तरावर काम करणारा स्वतंत्र कर्मचारी वर्ग नसल्यामुळे निवडणूक आयोगाच्या कार्यक्षमतेवरही त्याचा परिणाम होत असतो हे लक्षात घेऊन निवडणूक आयोग आणि निवडून येणारे नवे सरकार यांनी चर्चा करुन हा प्रश्न सोडविणे अगत्याचे आहे. त्यादृष्टीने मी प्रयत्न करीन,'' असेही श्री. राम नाईक यांनी शेवटी सांगितले.

**(कार्यालय मंत्री)**